पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC/ADM/NOTIFICATION/993 /2022 DATE :- 10 /12/2022

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रामध्ये एम एम आर डी ए अंतर्गत मेट्रो टप्पा क्रमांक ०४ चे ( मॉडेला चेक नाका ते तिन हात नाका, कापुरबावडी जंक्शन ते गायमुख घोडबंदर रोड ) टाटा व रिलायन्स अस्टाल्डी कंपनी मार्फत काम चालु आहे.

**ज्याअर्थी,** नमुद सेवा रस्त्यावर हॉटेल, मॉल, हॉस्पीटल, आस्थापना व निवासी संकुले असल्याने सदर परिसरात दैनंदिन वाहतुक कोंडी होत असते. तसेच सदर सेवा रस्त्यावर मुबलक पार्किंगची व्यवस्था नसल्याने स्थानिक रहिवासी व इतर आस्थापनांमध्ये येणारे वाहन चालक आपली वाहने सेवा रस्त्यावर पार्किंग करित आहेत त्यामुळे सर्व सामान्य नागरिक व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे या करिता वाहनांची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने व सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चीत रहावी याकरीता, आम जनतेच्या सोयीसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद** – १) पोखरण रोड नं ०२, रवि स्टील नाका, हरदास नगर, वंसत लॉन्सकडुन विवियाना मॉल, उत्सव हॉटेल, चिरागनगर, कॅडबरी जंक्शनकडे सर्व्हिस रोडने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना विवियाना मॉलचे गेट समोरील सर्व्हिस रोडजवळ (ज्युपिटर हॉस्पीटल गेटला लागून असलेल्या विवियाना मॉलचे गेटपासून) प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने ही शेठ अ‍ॅव्हलॉन बिल्डींग समोर असलेल्या ज्युपिटर हॉस्पीटल कट येथुन डावीकडे वळण घेवुन मुंबई नाशिक इस्टर्न एक्सप्रेस वे मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद** – २) मुंबई नाशिक इस्टर्न एक्सप्रेस वे वरून ज्युपीटर हॉस्पीटल कट मार्गे डावीकडे विवियाना मॉल, उत्सव हॉटेल, चिरागनगर, कॅडबरी जंक्शनकडे सर्व्हिस रोडने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना विवियाना मॉलचे गेट समोरील सर्व्हिस रोडजवळ (ज्युपिटर हॉस्पीटल गेटला लागून असलेल्या विवियाना मॉलचे गेटपासून) प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने ही शेठ अ‍ॅव्हलॉन बिल्डींग समोर असलेल्या ज्युपिटर हॉस्पीटल कट येथुन पुढे हरदास नगर, रवि स्टील नाका मार्गे सर्व्हिस रोडने अथवा उजव्या बाजूने मुंबई नाशिक इस्टर्न एक्सप्रेस वे वरून इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद** – ३) पोखरण रोड नं ०२ कडून टी.सी.एस. यंत्रा पार्क, आय थिंक लोढा, विवियाना मॉल चे पाठीमागील बाजुने रोडने उत्सव हॉटेलकडुन उजवीकडे वळण घेवून चिरागनगर, कॅडबरी जंक्शनकडे सर्व्हिस रोडने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना उत्सव हॉटेल समोरील सर्व्हिस रोडने उजवीकडे प्रवेश बंद करण्यात येत आहे

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने ही उत्सव हॉटेल समोरील सर्व्हिस रोडवरून डावीकडे वळण घेवुन विवियाना मॉल समोरील सर्व्हिस रोडने शेठ अ‍ॅव्हलॉन बिल्डींग समोर असलेल्या ज्युपिटर हॉस्पीटल कट येथुन पुढे हरदास नगर, रवि स्टील नाका मार्गे सर्व्हिस रोडने अथवा उजव्या बाजूने मुंबई नाशिक इस्टर्न एक्सप्रेस वे वरून इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसूचना मंजुर दिनांकापासुन १० दिवस प्रायोगिक तत्वावर अंमलात राहील.

सदरची अधिसूचना ही फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,ठाणे

२/– सदरची अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

- जिल्हाधिकारी, ठाणे
- आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
- अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

**प्रत माहितीसाठी,**

- प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
- नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
- ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.**

सहायक पोलीस आयुक्त, वागळे वाहतूक विभाग, ठाणे शहर.

पोलीस निरीक्षक, वागळे, कापुरबावडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner